Vol 7 Issue 2 Nov 2017

ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

Ashok Yakkaldevi
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Sanjeev Kumar Mishra

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

# REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2017


## विद्यापीठांच्या परीक्षा विभागाच्या प्रशासकीय कार्यपध्दतीच्या पुर्नरचनेची गरज




डॉ. तुषार निवृत्ती निकाळजे


**प्रस्तावना :**

प्रत्येक विद्यापीठामध्ये वेगवेगळ्या परीक्षांचे निकाल जाहीर करण्याकरिता स्वतंत्र परीक्षा विभाग अस्तित्वात आहे. हा परीक्षा विभाग विद्यापीठाचे हृदय, आत्मा म्हणून ओळखला जातो. कारण त्या विभागाचे कामकाज संवेदनशिल असते. परीक्षा विभागाच्या कामकाजाचा संबंध विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरणे ते पदवीप्रदान समारंभ आयोजित करून त्यांना पदवी देण्यापर्यंत असतो.

परीक्षा अर्ज भरणे, तत्पूर्वी शैक्षणिक पात्रता पूर्ण करणे. विनाविलंब १० ते १२ दिवस परीक्षा अर्ज स्विकारणे, नंतर विलंब शुल्क पुढील १० दिवसात परीक्षा अर्ज स्विकारणे. तदनंतर सुपरलेट फी सारख्या ज्यादा शुल्कांची आकारणी करून परीक्षा चालु होण्याच्या दोन दिवस अगोदर परीक्षा अर्ज स्विकारणे ही कार्यपध्दती अवलंबली जाते. परीक्षा विभागात काम करत नसलेला उपकुलसचिव लेट फी घेणे नियमबाह्य आहे असे वर्तमानपत्रास मुलाखतीमध्ये सांगतो. लगेचच दुसऱ्या दिवशी कुलगुरू काही विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज सुपरलेट फी सारखे ज्यादा शुल्क घेऊन विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज स्विकारण्याचे आदेश देतात. यामुळे परीक्षा विभागातील सेवकांकडे विद्यार्थी व पालक भेदभाव केल्याच्या भावनेने वाद घालतात. सेवकांची अशा परिस्थितीत वारंवार कुचंबना होते. ज्यादा शुल्क घेऊन परीक्षा अर्ज घेण्याची पध्दत अंदाजे १९८८ ते १९९० पासून चालु आहे. १९८८ ते १९९० या कालावधीमध्ये आखाती युध्द चालु असल्याने तेथील रहिवासी असलेल्या व भारतामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना युध्दाच्या परिस्थितीमुळे परीक्षा अर्ज नियोजित वेळेत भरता आले नव्हते. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता त्यावेळी तशी तरतुद करण्यात आली होती. परंतु ही पध्दत पुढे भारतीय विद्यार्थ्यांना लागु केली गेली.

सदरचे परीक्षा अर्ज घेतल्यानंतर त्याचे प्रवेशपत्र परीक्षा विभागामार्फत संबंधित महाविद्यालय व विद्यार्थ्यांना दिले जाते. काही वेळा विद्यार्थ्यांच्या चुकीने किंवा विद्यापीठाच्या चुकीने विद्यार्थ्यांच्या नावामध्ये स्पेलींग मिस्टेक, विषय बदल, पर्यायी विषयाची चुकीची नोंद इत्यादि चुका होतात. त्यावेळी विद्यार्थी फक्त नावातील स्पेलींग मिस्टेक वगळुन इतर चुकांची दुरूस्ती करून घेतो. सदर दुरूस्त्या त्वरीत कराव्यात अशी सुचना परीक्षा प्रवेश पत्रावर दिलेली असते. परंतु विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यानंतर ५ ते ७ वर्षांनी नावाच्या स्पेलींग मिस्टेक दुरूस्तीकरिता परीक्षा विभागाकडे येतो व त्वरीत दुरूस्ती करण्याची विनंती करतो. परंतु हे प्रशासकिय नियमाच्या आधारे त्वरीत करणे शक्य नसते. यावर प्रशासकीय मंजुरी संबंधित अधिकाऱ्यांकडून टिपणीव्दारे घ्यावी लागते. परंतु विद्यार्थ्याला त्यावेळी व्हिसा, पासपोर्ट, नोकरी व्हेरिफिकेशन इत्यादि कामाकरिता दुरूस्ती त्वरीत हवी असते. या विनंतीचे रूपांतर नंतर वादामध्ये होते.

परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थी अनुत्तिर्ण झाल्यास अथवा कमी गुण मिळाल्यास उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करतात. (मा. सर्वोच्च न्यायालयाने मार्च २००८ मध्ये भारतातील सर्वच विद्यार्थ्यांना संबंधित विद्यापीठांनी उत्तरपत्रिकांची छायांकित प्रत देण्याचा आदेश दिलेला आहे). यावेळी देखील विद्यार्थी सदर अर्ज विहित मुदतीमध्ये करीत नाहीत. नंतर माहिती अधिकारात अर्ज करून उत्तरपत्रिका छायांकित प्रत मागवितात. उत्तरपत्रिका छायांकित प्रत पुरविण्यासाठी विद्यापीठाने स्वतंत्र संगणक व तंत्रज्ञान यंत्रणा तयार केलेल्या आहेत. २०१५ पूर्वी पुनर्मूल्यांकनातील बदलासाठी १० गुणांची आवश्यकता होती. तदनंतर ती मर्यादा ५ गुणांवर केली आहे. तसा अध्यादेश मा. कुलपती तथा राज्यपाल यांनी जारी केला आहे. विद्यार्थी उत्तीर्ण होण्यासाठी किमान गुण व ग्रेस मार्क करिता याचा वापर करतात. त्यातही विद्यापीठांनी त्याचे शुल्क प्रत्येक विषयास रूपये ३०० वरून रूपये १५० केले आहे. त्यामुळे विद्यार्थीदेखील ५ ते ६ विषयांना अर्ज करतात. सदर सेवा पुरविण्यासाठी कालावधी ३० दिवसांवरून १५ दिवस करण्यात आला. त्यामुळे पूर्वीपेक्षा अर्जांची संख्या दुप्पट झाली, सेवा पुरविण्याचा कालावधी कमी झाला. परंतु प्रशासकीय सेवकांची संख्या गेल्या १० वर्षांत आहे तेवढीच राहिली. त्यामुळे प्रशासकीय कामकाजावर प्रचंड ताण येत असतो. काही प्रशासकीय सेवक याचा गैरफायदा घेऊन गैरप्रकार करतात. विद्यापीठ त्यांना निलंबित करून पोलीस व फौजदारी न्यायालयात याचिका दाखल होते. उत्तरपत्रिका छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकन विभागात जे सेवक काम करतात ते सकाळी ६-१५ ते रात्रौ १०-४५ पर्यंत काम करूनही आटोक्यात येत नाही. या ज्यादा कामाकरिता त्यांना विद्यापीठाच्या अधिकार मंडळामार्फत मान्यताप्राप्त मानधन मिळते. परंतु विद्यापीठातील एखादा अधिकार मंडळाचा माजी सदस्य 'परीक्षा विभागातील सेवक हे विद्यार्थ्यांच्या पैशावर दरोडा घालणारे दरोडेखोर आहेत' अशा प्रकारची बातमी वर्तमानपत्रात देतो.

कविवर्य नारायण सुर्वे यांच्या कवितेतील पुढील ओळी आठवतात- ''शेकडो वेळा चंद्र आला, तारे फुलले, रात्र धुंद झाली, भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बरबाद झाली.'' अशीच परिस्थिती या सेवकांची आहे का?

विद्यापीठांमध्ये परीक्षांच्या निकालाच्या कामापूर्वी उत्तरपत्रिका तपासणीचे काम परिक्षक असलेल्या प्राध्यापकांमार्फत केले जाते. विद्यापीठांमध्ये ज्ञानप्रबोधिनी (Academic Staff College) हा एक स्वतंत्र विभाग असतो. तेथे प्राध्यापकांची Refresher Courses, प्रशिक्षण घेतले जाते. तेथे नवनवीन अभ्यासक्रम, तंत्रज्ञान याची चर्चा-प्रशिक्षण दिले जाते. परंतु याचा गैरवापर विद्यापीठातील प्रशासकीय अधिकारी करतात. प्राध्यापकांना अशा प्रशिक्षणांना न बोलविता किंवा आयोजन न करता खोटी बिले तयार करून प्रशासकीय अधिकारी व

वित्त अधिकारी एकाच वेळी तीस लाख रूपयांपर्यंत घोटाळे करतात. प्रशासकीय सेवकांचे निलंबन होते परंतु वित्त अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई होत नाही.

विद्यापीठांकडे शासनमान्य पदांवर काम करणारे व विद्यापीठाचे स्वतंत्र निधीतून काम करणारे सेवक असतात. या निधीमधून विद्यापीठ अधिकार मंडळास, कुलगुरू, कुलसचिव यांना नेमणुका करण्याचे अधिकार असतात. ज्या सेवकांना गुणवाढ प्रकरणी खोट्या Refresher Courses चे घोटाळे/गैरप्रकारांमुळे निलंबित केलेले असतात त्या सेवकांना विद्यापीठा निधीतून स्वतंत्र नियुक्त्या केल्या जातात. सदर निधीमध्ये वास्तविक सेवक, विद्यार्थी, संशोधक यांची प्रगती व प्रोत्साहनाकरिता तरतुद असते. उच्च शिक्षण घेणाऱ्या (एम.फिल., पीएच.डी.) सेवकांना आर्थिक मदत, अध्ययन रजा सवलत, प्रोत्साहन देण्यासाठी हा निधी वापरला जात नाही. सदर निधी हा विद्यापीठ कायदा, विद्यापीठाचे अधिकार व कर्तव्य कलम ५ नियम ३२ व ३४ नुसार वापरला जावा असे अपेक्षित असते. सेवकांची कार्यक्षमता वाढीसाठी काही विद्यापीठांमध्ये गेल्या १८ वर्षांमध्ये फक्त ३ ते ४ वेळाच कार्यशाळा झाल्या आहेत.

परीक्षांचे निकाल जाहीर केल्यानंतर वर्षभर गुणपत्रके अथवा उत्तीर्ण प्रमाणपत्रे छापले जात नाहीत. परंतु वर्तमानपत्रात बातमी आल्यानंतर दोनच दिवसांत ही छपाई पूर्ण होते.

विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासण्याचे काम हे स्वतंत्ररित्या काही महाविद्यालयांकडे केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाव्दारे केले जाते. काही विद्यापीठांकडे त्यांचा स्वतःचाच असा विभाग आहे.

विद्यार्थ्यांचे निकालात वेगवेगळ्या त्रुटी अथवा चुका झाल्यास त्यांना दुरूस्त केलेले निकाल देण्यास बऱ्याच वेळा विलंब लागतो. या प्रकारास त्रासलेले काही विद्यार्थी कुलगुरू, कुलसचिव, परीक्षा नियंत्रक यांना आत्महत्या करण्याबाबतची पत्रे, निवेदने, तक्रार अर्ज करतात. त्यांची कामे तदनंतर दोन दिवसांत पूर्ण होतात. परंतु या विद्यार्थ्याची चौकशी केली असता तो असे सांगतो की 'मला सदर पत्र विद्यापीठातील एका सेवकाने किंवा अधिकाऱ्याने लिहिण्यास सांगितले. माझा असा कोणताही विचार नव्हता.' हा विद्यापीठातील सेवक - अधिकारी - संघटना यांच्या अंतर्गत कलहाचा दुरूपयोग विद्यार्थ्यांमार्फत होतो का?

विद्यार्थ्यांची कामे होत नसल्याने विद्यापीठातील परीक्षा विभागात विद्यार्थ्यांचे पालक येतात. काही पालक सेवकांना शिवीगाळ करण्यासही मागेपुढे पहात नाहीत. या बातम्या प्रसारमाध्यमामार्फत प्रसिध्द होऊनही विद्यापीठ प्रशासन विभागास जाग येत नाही.

विद्यार्थ्यांचे गुणपत्राकावर विद्यार्थी परीक्षेस हजर असूनही गैरहजर दाखविले जातात. वर्तमानपत्रात फोटोसह बातमी येते. यावर विद्यापीठातील सेवक परीक्षा नियंत्रकांमार्फत कुलगुरूंना निवेदन देतो. हे निवेदन पुढील पाच वर्षात कुलगुरूंपर्यंत तर पोहोचतच नाही उलट हे निवेदन रद्दीमध्ये जमा केले जाते.

विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये अवैध गुणवाढ प्रकरणे, लेजरची पाने बदलणे, यावर विद्यापीठ कोणतीही उपाययोजना करीत नाही. संबंधित सेवकावर किंवा अधिकाऱ्यावर कारवाई केली जात नाही.

पीएच.डी. प्रबंध परिक्षकाकडे तपासणी करण्यासाठी पाठविण्याच्या प्रक्रियेकरिता परदेशी विद्यार्थ्यांकडून हिऱ्याची मागणी होते. हिरा मागणारा सेवक अद्यापही सापडलेला नाही.

सद्याचे तांत्रिक युग असल्याने प्रशासकीय कामकाजात तंत्र, संगणक इत्यादिचा वापर केला जातो. त्याकरिता विद्यापीठांमध्ये स्वतंत्र तंत्र विभाग आहे. तसाच तंत्र विभाग परीक्षा विभागाशी संलग्न आहे. तांत्रिक काम पाहणारे टेक्निशियन कंत्राटी पध्दतीने घेतले जातात. त्यामुळे उद्याच्या दिवशी आपला पगार चालू राहावा म्हणून सदर टेक्निनिशयन आजचे काम उद्यावर ढकलतो.

परीक्षा गोदाम विभाग म्हणजे शिक्षा भोगण्याचे स्थळ समजल जातं. जस शासनाच्या अधिकारी किंवा सेवकांच्या बदल्या चंद्रपूर, गडचिरोली सारख्या दुर्गम ठिकाणी झाल्यानंतर जी परिस्थिती असते तशीच येथेही जाणवते. एम.फिल., पीएच.डी. सारखे उच्च शिक्षण घेणाऱ्या अथवा पूर्ण केलेल्या सेवकांचे मानसिक खच्चीकरण करण्यासाठी परीक्षा गोदाम विभागात चक्क हमाली काम करण्यासाठी बदली केली जाते. तेथील अधिकारी इतर सेवकांचीही छळवणुक करतात. सेवकांनी तक्रार अर्ज केल्यास तक्रार अर्जच प्रशासन विभागातून कोणतीही कार्यवाही अथवा कारवाई न होता गायब होतो.

परीक्षा विभागातील महिला लाकडी खुर्ची तुटून पडते. तिच्या पाठीच्या मणक्याला ८ ते ९ महिने औषधोपचार घ्यावे लागतात. त्याकरिता ती महिला कार्यालयामार्फत कोणतीही विशेष रजा घेत नाही अथवा आर्थिक मदतही घेत नाही. ही खुर्ची तुटली का तोडली? याकरिता परीक्षा नियंत्रकांकडून सीसीटीव्ही फुटेज मागविले असता 'सीसीटीव्ही दुरूस्तीचे काम चालू असल्याने फुटेज उपलब्ध नाही' हे उत्तर दिले जाते. परीक्षा विभागातील दुसऱ्या एका सेवकास विद्यार्थी बाचाबाची करून धमकी देवून जातो. त्याचे सीसीटीव्ही फुटेज मागविले असता पुन्हा 'सीसीटीव्ही दुरूस्तीचे काम चालू असल्याने फुटेज उपलब्ध नाही' हे उत्तर दिले जाते. असा कोणताही पुरावा नसल्याने सेवकांवर होणारा अन्याय उघडकीस येत नाही. एका विद्यापीठात सुरक्षा अधिकाऱ्याची काही वर्षांपूर्वी हत्या झाली होती. त्यावेळी सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध नसल्याने मारेकरी अद्यापही सापडलेले नाहीत.

नवीन कुलगुरू आल्यानंतर परीक्षा विभागाची तपासणी करतात. लाकडी खुर्च्या, टेबल, संगणक इत्यादिंसारख्या पायाभुत सुविधांकरिता कार्यकारी अभियंता, स्थावर विभाग यांना पुरवठा करण्याचे आदेश देतात. परंतु चार महिने उलटूनही त्याची पुर्तता होत नाही. कारण सदर कार्यकारी अभियंता माजी कुलगुरूंच्या बंगल्याचे कामकाजावर सुपरविजन करत असल्याचे समजते. तसेच हा कार्यकारी अभियंता विद्यापीठातील हेरिटेज वॉल्स बांधण्याच्या कामात गर्क असल्याचे समजते.

परीक्षा विभागातील काही सेवक व अधिकारी हे प्रामाणिकपणे, नैतिक जबाबदारी म्हणून स्वतः अथवा त्यांचे पाल्य एखाद्या विद्यापीठ परीक्षेस बसत असल्यास प्रशासन विभागास कळवून परीक्षा विभागातून बदली करून घेतात. हा परीक्षा विभागातील पारदर्शकतेचा एक संकेत समजला जातो. विद्यापीठाने एका अधिकाऱ्यास परीक्षा विभाग प्रभारीपद सहा महिन्यांकरिता दिले. त्या अधिकाऱ्याची पत्नी विद्यापीठाची एक परीक्षा देत होती, त्या अधिकाऱ्याने स्वतःच्या पत्नीस परीक्षेस न बसण्याची विनंती केली. हे त्याचे योगदानच समजावे का? अशा प्रामाणिक घटना बऱ्याच वेळा घडतात. परंतु सद्याची परिस्थिती पहाता काही सेवक व अधिकारी, त्यांचे पाल्य, विद्यापीठाच्या परीक्षेस बसत असल्यास त्याच विभागात बदली करून घेतात. प्रशासनाचे हे निदर्शनास येवूनही काहीही कार्यवाही होत नाही.

एका विद्यापीठाचा पदवीप्रदान समारंभ राज्यपालांची परवानगी न घेतल्याने रद्द झाला. या पदवीप्रदान समारंभाकरिता किमान १० ते २० लाख रूपये खर्च झाला होता. या प्रकारास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांकडून हा खर्च अद्यापही वसुल केला गेलेला नाही. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून एक नामवंत आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञ येणार होते.

आय.एस.ओ. सारखे समकक्ष तंत्रज्ञान वापरून प्रशासकीय यंत्रणा अद्ययावत करण्यासाठी कुलसचिवांना विनंती केली असता त्याकडे दुर्लक्ष केले जाते. या प्रकारच्या तंत्रज्ञानामुळे विद्यापीठात येणाऱ्या विद्यार्थ्यांना, पालकांना अथवा इतरांना घरी बसूनच संगणकावर क्लिक केल्यास विद्यापीठाची संपूर्ण माहिती मिळू शकते.

वरील बऱ्याचशा बाबींसंदर्भात एका विद्यापीठातील कुलगुरूंनी सन २०१२ मध्ये परीक्षा विभागाच्या संपूर्ण कामकाजाचे ऑडीट करण्यासाठी ऑडीटरची नेमणूक केली होती. परंतु तो ऑडीट रिपोर्टच पुढ काय झालं? याचा अद्याप कुठेही उल्लेख नाही.

५ ते ६ कोटी खर्च करून परीक्षा विभागाची ४ ते ५ मजली इमारतीचे ६ वर्षे बांधकाम केले जाते. ती वापरलीही जात नाही. जुन्याच परीक्षा विभागात अडगळीतल्या खोलीत काम करणारे सेवक १० तास कसे काम करीत असतील?

एखाद्या विद्यापीठातील शासनमान्य पदे व प्रत्यक्ष भरती झालेली माहिती याची सांख्यिकी माहिती खालीलप्रमाणे :

| अ.नं. | पदनाम | शासनमान्य संख्या | प्रत्यक्ष भरती केलेली संख्या |
|---|---|---|---|
| १. | टेक्निकल/लॅबोरेटरी स्टाफ | २७० | १९७ |
| २. | लायब्ररी स्टाफ | ३० | २४ |
| ३. | मंत्रालयीन/सचिवालय/ प्रशासकीय | ६४८ | ५०६ |
| ४. | गट-ड (शिपाई, परिचर, मदतनीस इ.) | २९७ | २५० |
| | एकूण | १२४५ | ९७७ |

परंतु विद्यापीठाच्या अधिकारात भरावयाच्या पदांची (विद्यापीठ निधीतून) संपूर्ण भरती झालेली असते.

सन २०१५ पासून विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी दिलेल्या आदेशानुसार वर्षातुन दोन वेळा पदवीप्रदान समारंभ आयोजित केला जातो. पूर्वी वर्षातून एकदाच हा समारंभ होत होता. त्यामुळे परीक्षांचे निकाल ते पदवीप्रदान समारंभ हा कालावधी अतिशय कमी झाला आहे. या कालावधीमध्ये इतर कामांचा समावेश असतो. उदा. उत्तरपत्रिका छायांकित प्रत, पुनर्मूल्यांकन, निकालातील त्रुटी, पारितोषिकांची यादी तयार करणे, गुणवत्ता यादी तयार करणे. पारितोषिकांची यादी तयार करणे, गुणवत्ता यादी तयार करणे याकरिता स्वतंत्र विभाग व सेवक वर्ग असतात. परंतु हे काम परीक्षा विभागाकडेच सुपूर्त करण्यात येते. त्याकरिता स्वतंत्र सेवक वर्ग किंवा ज्यादा सेवक वर्ग दिला जात नाही.

विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या सहमंडळाकडून (Joint Board of Vice Chancellors) वार्षिक सभेव्दारे प्रत्येक राज्यातील नवीन उपक्रमांची अपेक्षा आहे.

महाविद्यालय, शैक्षणिक संस्था यांच्याकडे कायमस्वरूपी पूर्ण वेळ प्रशासकीय सेवक, प्राध्यापक नसतात. एकूण शासनमान्यतेच्या फक्त ३० ते ४० टक्केच सेवक व प्राध्यापकांची नियुक्ती केली जाते. इतर सेवक व प्राध्यापक एकत्रित वेतन, तासिका पध्दती, व्हिजिटींग लेक्चर्स पध्दतीने होतात. त्याचा संबंध प्रत्यक्ष विद्यापीठांचे कामकाजाशी असतो. त्याचा परिणाम होत असतो. शैक्षणिक संस्थांचे सेवक व प्राध्यापक हा एक वेगळा स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे.

सध्या प्रशासकीय कामकाजाला तांत्रिक जोड मिळालेली आहे. त्याला विद्यापीठ व परीक्षा विभाग अपवाद नाही. परीक्षा विभागामध्ये स्वतंत्र तांत्रिक कक्ष जोडला आहे. मुख्य परीक्षा विभागात प्रशासकीय कामकाज चालते. या प्रक्रियेमध्ये प्रशासकीय कामकाज करताना Public Policy/Public Administration तर तांत्रिक विभागात काम करताना Corporate Policy (Governance) चा अवलंब होतो. त्यामुळे कामांमध्ये तफावत जाणवते. या दोन्ही धोरणांचा एकत्रित विचार करून प्रशासकीय कामात योग्य तो बदल घडविला जाणे ही काळाची गरज आहे.

गेल्या आठ वर्षात परीक्षा विभाग प्रशासकीय कामात तंत्रज्ञानाचा समावेश करून देखील अद्याप छपाई केलेले कार्यालयीन लेजर्स / नोंद पुस्तके अलग करण्याचा शिपायास हातानेच प्रत्येक पृष्ठ काढावे लागते. एका परीक्षेच्या वेळी एका शाखेची किमान बारा हजार पृष्ठे असतात. ही पृष्ठे सलग फाढण्याचे काम केल्यास सात दिवसांचा कालावधी लागतो. आठव्या दिवशी शिपायाचा हात दुखत असल्याने पुढील दोन दिवस तो वैद्यकीय रजा घेतो. ई-लेजर्स प्रणाली अवलंबल्यास कागदाचा देखील खर्च वाचेल.

सनदी अधिकारी, संरक्षण अधिकारी, विद्यापीठाचे कुलगुरू यांना शासनामार्फत अथवा त्यांचे कार्यालयामार्फत घरगुती कामाकरिता (स्वयंपाक, मुलांना शाळेत सोडणे, कपडे इस्त्री करणे, घरकाम इत्यादि) सेवकवर्ग पुरविला जातो. ९ वर्षे परीक्षा नियंत्रक कार्यालयामध्ये चार परीक्षा नियंत्रकांमसमोरील सकाळी ८-३० ते रात्रौ ९.०० वाजेपर्यंत काम करणाऱ्या शिपायाची बदली नवीन आलेला पाचवा परीक्षा नियंत्रक करतो. कारण त्या परीक्षा नियंत्रकाचे घरचे कपडे दुकानातुन इस्त्री करून आणण्यास तो शिपाई नकार देतो. अधिकाऱ्याने स्वतःची मानसिकता बदलनेही आवश्यक आहे.

'विद्यापीठांचे कुलगुरू हे प्रशासकीय अधिकारी असावेत' असे मत एका राज्याच्या माजी मुख्यसचिव, माजी प्रभारी कुलगुरू तथा माजी राज्य माहिती आयुक्त पदावर काम केलेल्या तज्ञाने व्यक्त केले आहे.

सध्या भारतीय शिक्षणावर विदेशी शिक्षणाचा प्रभाव वाढत आहे. भारतामध्ये स्वतंत्र परदेशी विद्यापीठे स्थापन होत आहेत. याचा गांभियनि विचार व्हावा. अन्यथा भारतीय विद्यापीठांची विचारसरणी मागे पडून परदेशी विद्यापीठांच्या विचारसरणीचे वर्चस्व निर्माण होण्याची शक्यता आहे.

एका विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू असलेल्या सनदी अधिकाऱ्याने विद्यापीठाच्या परीक्षा विभागाचे २०१२ साली ऑडीट केले होते. परंतु त्या ऑडीट रिपोर्टच पुढे काय झाल? याचा अद्याप शोध लागलेला नाही.

शैक्षणिक व्यवस्थेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी व प्रशासकीय कामांमध्ये सुसुत्रता आणण्यासाठी शासकीय स्तरावर कठोर व निःपक्षपाती प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्याकरिता कठोर धोरणांचे अवलंबन व सुधारणा होणे आवश्यक आहे.

बदलते भारतीय शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण, विकास या संकल्पनांचे धोरण ठरविताना विद्यापीठातील इतर विषयांबरोबरच परीक्षा विभागाच्या कार्यपध्दतीचाही स्वतंत्र विचार व्हावा.

संदर्भ:

१. भारतीय संविधान अनुच्छेद ३०९.

२. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४, २०१७.

३. UGC Schemes, A manual for Universities, Colleges and Research Institutions, Mangal Deep Publications, Jaipur 2001.

४. The University Grants Commission Act, 1956.

५. Education & the Significance of Life : J. Krihnamurti : 2005.

६. National Policy of Education, 1968.

७. www.nuepa.org/New/download/NEP 2016/Report NEP.

८. शिक्षण आणि जीवन काही विचार : प्राचार्य पंडितराव पवार : के.के.वाघ कॉलेज, नाशिक : ऑगस्ट २००३.

९. दैनिक सकाळ दि. २८ ऑगस्ट २०१६ नव्या शैक्षणिक धोरणाच्या दिशेने : प्रकाश जावडेकर.

१०. शिक्षण : डॉ. राधाकृष्णन यांचे चिंतन.

११. शिक्षण आणि समाजपरिवर्तन : डॉ. जनार्दन वाघमारे : शिक्षण- प्रा. विलास रणसुंभे : लोकवाङ्:मय गृह : जून २००५.

१२. दैनिक सकाळ : दि. १७ जुलै २०१७ : कुलगुरू हा प्रशासकीय अधिकारी हवा.

१३. दैनिक लोकमत : १० मे २०१७ : पदवीप्रदान समारंभ रद्द.

१४. दैनिक लोकमत: ११ मे २०१७:प्राध्यापदपदासाठी द्यावी लागतेय लाखोंची लाच.

१५. दैनिक सकाळ : ९ मे २०१७ : विद्यापीठाशी नाळ असलेला कुलगुरू हवा.



डॉ. तुषार निवृत्ती निकाळजे

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com